# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २०/०८/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत इंदीरा नगर, नरखेड येथे दि. १९/०८/२०२२ चे ०२.०० वा. ते ०३.०० वा. सुमारास **वैशालीनी सुरज ढोके(मृतक), वय ३३ वर्षे, रा. इंदीरा नगर, नरखेड** ही ९ महिन्याची गरोदर असल्याने तिच्या पोटात दुखत होते. त्यामुळे तिला ग्रामीण रूग्णालय नरखेड येथे उपचाराकरीता नेले असता तिला मुलगा झाला. त्यानंतर काही वेळाने तिच्या पोटातला गोळा बाहेर आला व रक्तस्त्राव सुरू झाला. त्यानंतर तेथील डॉक्टरांनी सांगितले की, नागपूरला मेयो हॉस्पीटल येथे रेफर केले. तिला पुढील उपचाराकरीता मेयो हॉस्पीटलसाठी नेत असता सावरगाव जवळ तिची प्रकृती गंभीर झाली. त्यामुळे तिला काटोल ग्रामीण रूग्णालय येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी सांगितले की, पेशंट ही मरण पावली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरज दिलीपराव ढोके, वय ३५ वर्ष, वार्ड क्र. १७ नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मनोज गाढवे मो.नं. ८८०५४०५१०७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत सावरगाव येथे दि. १८/०८/२०२२ चे २०.३० वा. ते दि. १९/०८/२०२२ चे ०७.३० वा. सुमारास **देवेंद्र मोतीराम रेवतकर(मृतक), वय ४० वर्षे, रा.सावरगाव** अती जास्त दारू पिण्याच्या सवयीचा असल्याने त्याची पत्नी त्याला सोडुन एक वर्षापुर्वी तिच्या मुलाला घेवुन माहेरी गेली होती. त्याचा काही दिवसांपुर्वी मोटारसायकलने ॲक्सीडेंट झाला होता व त्यामध्ये त्याच्या उजव्या पायाला जास्त मार लागल्यामुळे त्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचार केला होता. तेव्हापासुन त्याच्या पायचे दुखने चालुच होते. त्याच्याने चालने होत नव्हते, तो घरी एकटाच रहात होता, काही दिवसांपासुन त्याचे गालाला व मानेला फोड होवुन त्यामधुन पस बाहेर निघत होता. दि १९/०८/२२ चे ०७.३० वा. फिर्यादी हा त्याचे घरी गेला असता त्याचे घरी तो दिसला नाही. आजुबाजुला शोध घेतला व नातेवाईकांना सांगितले सर्वांनी मिळुन त्याचे घरापासुन थोडया अंतरावर असलेल्या विहीरीमध्ये पाहीले असता तो विहिरीमध्ये दिसुन आला. मृतक हा गळयाला फोड आल्याने व उजवा पाय फॅक्चर झाल्याने त्याचा त्रास होत असल्याने त्रासाला कंटाळुन त्याने घराजवळील विहीरीत उडी घेवुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धनराज मोतीराम रेवतकर, वय ३५ वर्ष, रा. सावरगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक सुधाकर शेंद्रे मो.नं. ९२७०९८८९०४ हे करीत आहे.

३) पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत २.५ कि. मी. अंतरावरील वेना नदी येथे दि. १९/०८/२०२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी चा पती **विजय श्रीराम आत्राम (मृतक), वय ३५ वर्ष रा. रूईखैरी, विनायक वाकोडे यांचे घरी किरायणे** हा दि १६/०८/२२ रोजी १८.३० वा. कंपनीत जातो असे सांगुन घरून निघुन गेला. तो घरी न आल्याने फिर्यादीने पोस्टे बुटीबोरी येथे मिंसीग क्र ४९/२२ अन्वये तक्रार दिली. दि १९/०८/२२ रोजी फिर्यादीचे पती वेणा नदीच्या पात्रात पाण्यात पडुन बुडुन मृत अवस्थेत आढळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ग.भा योगिता विजय आत्राम, वय २४ वर्ष, रा. रूईखैरी विनायक वाकोडे यांचे घरी किरायणे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक देव्हारे मो.क्र ९८२२३९४५९७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर